**नि. फौ. ख. क्र.२८९/२०१५**

सरकार वि. सविता पांडूळे व इतर.

**नि.क्र.५७**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव– हरिभाऊ सुखदेव भाळे ,**

वय–३८ वर्षे, व्यवसाय–शेती,

रा. खोरोची, ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. लोहकरे, यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

घटना दि.०१/०२/२०१५ रोजी दुपारी ०२.०० च्या सुमारास गट नं.५५४ मध्ये घडली. त्या दिवशी मी, माझा भाऊ व वहिणी अश्विनी शेतामध्ये गेलो होतो. त्यावेळी आरोपी तेथे आले व त्यांनी तुम्ही घेतलेले क्षेत्र कसे घेतले असे म्हणाले. त्यांना आम्ही सांगितले की, आम्ही क्षेत्र पुर्व पश्चिम उत्तर बाजूचे २० गुंठे घेतलेले आहे. त्यानंतर त्यांनी मला व माझ्या भावाला लाथाबुक्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. त्यानंतर मला ढकलून दिले व रामदास पांडूळे याने माझ्या डोक्यात काठी मारली. माझी वहिणी भांडण सोडविण्यासाठी आली असता तिच्याही डोक्यात रामदास पांडूळे याने काठी मारली. सविता पांडूळे हिने माझी वहिणी अश्विनी हिला लाथाबुक्यांनी मारले व जिवे मारण्याची धमकी दिली. त्या भांडणामध्ये माझ्या वहिणीचे मनीमंगळसूत्र गहाळ झाले. त्यानंतर आरोपी तेथून निघून गेले. आम्ही बावडा पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी आम्हाला दवाखान्यात जाण्यासाठी यादी दिली. उपचार घेतल्यानंतर पोलीस स्टेशनला आरोपींच्याविरुध्द तक्रार दिली. दि.०२/०२/२०१५ रोजी पोलीसांनी माझा जबाब नोंदविला. ज्या काठीने मारहाण केली ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला सदर काठी दाखविली. ती तीच आहे. त्यास पुर्वीच आर्टीकल अ देण्यात आलेले आहे. आज रोजी आरोपी सविता व अजित हजर आहेत इतर आरोपी गैरहजर आहेत.

आरोपींच्या ओळखीबाबत आक्षेप नाही.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपींतर्फे श्री.एस. एच. खाडे, विधीज्ञ यांचेमार्फत –**

२. कृष्णा पाटोळे हे पुर्वी आमचेकडे कामाला होते. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्ष देण्यासाठी माझ्या भावाबरोबर आलो. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझे भावामध्ये जमिनीचे वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाऊ वेगवेगळे राहतो. माझे शिक्षण बी. कॉम. झालेले आहे. मी व आरोपी करे पांडूळेवस्तीवर राहतो. त्या वस्तीवर दहा ते पंधरा घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वस्तीवर जाण्यासाठी मानेवस्ती ते खोरोचीच्या कॅनॉलवरून जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, कॅनॉलच्या पश्चिम बाजूला पुर्व पश्चिम रस्ता आमच्या घरी जाण्यासाठी आले. मला दिशा कळतात. हे म्हणणे खरे नाही की, कॅनॉलच्या पश्चिम बाजूला पुर्व पश्चिम असा पांडूळेवस्तीकडे जाणारा रस्ता आहे. आमच्या तथाकथीत क्षेत्राच्या उत्तर बाजूने पुर्व पश्चिम रस्ता पांडूळेवस्तीकडे जाणारा आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. तथाकथीत २० गुंठ्ठे क्षेत्र माझ्या नावावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत २० गुंठ्ठे क्षेत्राच्या शेजारी लक्ष्मण महानवर व पोपट महानवर यांची घरे आहेत. २० गुंठ्ठे क्षेत्रापासून पांडूळेवस्ती १ ते २ कि.मी.अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पांडूळेवस्तीवर पोपट करे, आण्णा महानवर, रामचंद्र शिंगाडे यांची घरे आहेत. २० गुंठ्ठे जमिनीच्या शेजारी कोणाची घरे आहेत अथवा कोणाच्या जमिनी आहेत हे मला सांगता येणार नाही.

३. गट नं.५५४ चे क्षेत्र हे खरेदीपुर्वी ३० गुंठ्ठे होते. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.५५४ मधील ३० गुंठ्ठे क्षेत्र राहूल भोसले व मुकूंद भोसले यांचे मालकीचे होते. गट नं.५५४ मधील २० गुंठ्ठे क्षेत्र माझ्या भावाने राहूल भोसले याचेकडून खरेदी केले होते. २०१३ मध्ये मुकूंद भोसलेकडून आरोपीने गट नं.५५४ मधील १० आर क्षेत्र खरेदी केले का कसे मला माहीती नाही. गट नं.५५४ मध्ये आरोपींचे १० आर क्षेत्र आहे. गट नं.५५४ मधील १० आर क्षेत्र हे मुकूंद भोसलेचेच होते का कसे हे मला माहीत नाही. राहूल भोसले

व मुकूंद भोसले हे एकमेकांचे सावत्र भाऊ आहेत का कसे हे मला माहीत नाही. राहूल भोसले व मुकूंद भोसले यांचेमध्ये दिवाणी दावे झाले आहेत का कसे याची मला माहिती नाही. माझ्या भावाने आरोपींच्यावर व मुकूंद भोसले यांचेवर दिवाणी दावा क्र.६४/२०१५ दाखल केला आहे किंवा कसे मला माहीत नाही. आरोपींनी दाखल केलेले किरकोळ अपील क्र.४/२०१७ हे आरोपींच्या बाजूने झाले किंवा कसे मला माहीत नाही.

४. आरोपींचे एकूण मिळून २० ते २५ एकर क्षेत्र आहे का कसे मला माहीत नाही. आरोपी ऊसाचे व मकाचे पिक घेतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीपेक्षा आम्हाला क्षेत्र कमी आहे. १० गुंठे क्षेत्राच्या दक्षिण बाजूला आरोपींचे उर्वरित क्षेत्र आहे का कसे मला माहीत नाही. आरोपींनी त्यांना रस्ता नाही म्हणून १० गुंठे क्षेत्र हे मुकूंद भोसले याचेकडून रस्त्यासाठी खरेदी केले का कसे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे १० गुंठे खरेदी केलेल्या क्षेत्रातून ये जा करतात का कसे हे मला माहीत नाही. आरोपींचा व आमचा १० गुंठे व २० गुंठे क्षेत्राबाबत वाद चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, राहूल भोसले याने चर्तुःसिमा न टाकता क्षेत्र माझ्या भावाला विकलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुकूंद याने चर्तुःसिमापुर्वक क्षेत्र आरोपी यांना विक्री केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींना १० गुंठे क्षेत्रातून जायचे नाही असे म्हणून त्यांची अडवणूक करतो. आरोपींनी आमचेविरुध्द फौजदारी केसेस केल्या आहेत का कसे हे मला माहीत नाही. आरोपी रामदास हा शिक्षक आहे. आरोपी क्र.१ व ६ हे इंदापूर येथे अंबिकानगर मध्ये राहतात का कसे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.५ हा अकलूजमध्ये राहतो. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनेच्यावेळी आरोपी क्र.३ हा कळंब येथे शिकण्यासाठी होता. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनेवेळी आरोपी क्र.४ हा चालक म्हणून काम करत होता. हे म्हणणे खरे नाही की, घटना दि.०१/०२/२०१५ रोजी गट नं.५५४ मध्ये घडली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मी, माझा भाऊ, वहिणी शेतामध्ये गेलो असता आरोपींनी आम्हाला लाथाबुक्यांनी मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रामदास याने मला डोक्यात काठी मारली व माझ्या वहिणीला काठी मारली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सविता हिने माझ्या वहिणीला लाथाबुक्यांनी मारहाण केली व जिवे

मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मला डोक्याला कोणतीही दुखापत झाली नव्हती.  हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तिघांनी संगनमत करून आरोपींच्याविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली.  आर्टीकल अ सारख्या काठया शेतात कुठेही आढळतात.  आर्टीकल अ वर विशीष्ट खूण नाही.  हे म्हणणे खरे नाही की, शेतीच्या वादावरून आरोपींना त्रास देण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, शेतातील कामे करताना पडल्यामुळे मला जखम झाली.  हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.१४/०८/२०२४**